भारतीय सौर २९ आश्विन १९४६
अमरावती,मंगळवार दि. १५ ऑक्टोबर २०२४

१९ ते २४ ऑक्टोबर मुंबईत मामी चित्रपट महोत्सव

मुंबई दि. १४ : मुंबईच्या सिनेवर्तुळात प्रतिष्ठेचा मानला जाणारा मुंबई अकॅडमी ऑफ मूव्हिंग इमेजेस मामी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यंदा १९ ते २४ ऑक्टोबर या कालावधीत मुंबईतील आयनॉक्स पीव्हीआर आणि रिगल या चित्रपटगृहांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. यंदा या महोत्सवात जगभरातील पन्नासएक विविध भाषांमधील ११० हून अधिक चित्रपटांची पर्वणी सिनेरसिकांना अनुभवता येणार आहे.महोत्सवातील विभागांमध्ये दक्षिण आशिया स्पर्धा, फोकस दक्षिण आशिया (स्पर्धाबाह्य), जागतिक सिनेमा, ट्रिब्युट्स, रिस्टोर्ड क्लासिक्स, गाला प्रीमियर्स, मास्टरक्लासेस, डायमेंशन मुंबई आणि रॉयल स्टॅग बॅरेल सिलेक्ट लार्ज शॉर्ट फिल्म्स यांचा समावेश असणार आहे. तसेच यावर्षी २० पेक्षा जास्त वर्ल्ड प्रीमियर्स, २५ पेक्षा जास्त आशिया प्रीमियर्स आणि ३५ पेक्षा जास्त दक्षिण आशिया प्रीमियर्स होणार आहेत.

हिंदुस्थान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवाला आजपासून प्रारंभ; २१ ऑक्टोबरला 'मौन श्रद्धांजली'

(हेमंत निखाडे)

श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम दि. १४ : संपूर्ण विश्वाला मानवतेचा संदेश देणारे क्रांतीदर्शी युगपुरुष राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५६ वा पुण्यतिथी महोत्सव आज(ता.१५) पासून गुरुकुंज आश्रमात सुरू होत असून अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम यांनी या महोत्सवाची जय्यत तयारी केली आहे.

या सात दिवसीय महोत्सवात दररोज सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना व त्यावरील चिंतन, ग्रामसफाई, प्रवचन, कीर्तन संमेलन (गुरुकुंज वारी), भजनसंध्या, खंजेरी भजन, योगासन शिबिर, वक्तृत्व स्पर्धा, ग्रामगीताचार्य पदवीदान समारंभ, कार्यकर्ता संमेलन, महिला मेळावा, अभंग गायन तसेच सामुदायिक प्रार्थना विश्वशांतीचा महामंत्र या विषयावरील परिसंवादात विदेशी भाविक सहभागी होणार आहे. यामधील सर्वात भावस्पर्शी कार्यक्रम मौन श्रद्धांजलीचा असून दि.२१ ऑक्टोंबर २०२४ रोजी होत आहे. आज पहाटे ४ वाजता तिर्थस्थापना, चरणपादुका व महासमाधी पूजनाने या महोत्सवाची सुरूवात होणार असून सामुदायिक ध्यानानंतर गुरुकुंज आश्रमात राष्ट्रसंतांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा निघणार आहे. रात्री वरखेड येथील महिला भजन मंडळाचा खंजिरी भजनाचा कार्यक्रम व रात्री पंकज महल्ले व सचिन काळे यांचे कीर्तन होणार आहे. दि.१६ ला सामुदायिक ध्यान व चिंतन डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल, योगासन व प्राणायाम योगाचार्य धानोरकर, ग्रामगीता प्रवचन प्रतिक बारी, दुपारी ११ ते ५ आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा, सायंकाळी ६ ते ७ सामुदायिक प्रार्थना व चिंतन अरविंद राठोड, रात्री ७ ते ८ आडकोजी महाराज भजन मंडळ, तिवसा यांचे खंजिरी भजन, चंद्रपूर महिला भजन मंडळाचे खंजिरी भजन रात्री ९ ते १० गजानन दिघडे यांचे कीर्तन होणार आहे. दि. १७ ला सामुदायिक ध्यान व चिंतन विलास साबळे, योगासन, सकाळी ८ ते ९ ग्रामगीता प्रवचन नीळकंठ हळदे, दुपारी ११.३० ते १२.०० कु. धनश्री खंडारे यांची अभंगवाणी, दुपारी १२ ते ५ पुष्पाताई बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला संमेलन आयोजित केले असून या संमेलनाचे मार्गदर्शक विजयाताई मारोतकर व प्रमुख अतिथी कल्पना दिवे (सभापती पं. स. तिवसा), वैशाली धुमोणे (सरपंच, गुरुदेवनगर) तसेच डॉ. लक्ष्मीताई जवंजाळ, डॉ. वसुंधरा बोंडे, डॉ. नयनाताई कडू, गौरी देशमुख, संगीता शिंदे, माधवी ढवळे यांची उपस्थिती राहणार आहे. सायंकाळी ६ ते ७ सामुदायिक प्रार्थना व चिंतन पुष्पाताई बोंडे, रात्री ७ ते ८ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले भजन मंडळ चनाखा यांचे खंजिरी भजन, रात्री ८.३० ते ९.३० ज्योतीताई धनाडे यांचे किर्तन, रात्री ९.३० ते १०.३० नारायणदास पडोळे यांचे कीर्तन होईल. शुक्रवार दि. १८ ला



सामुदायिक ध्यान व चिंतन संदिप गिन्हे, सकाळी ८ ते ९ विजय ठाकरे यांचे ग्रामगीता प्रवचन, सकाळी ९ ते १० कु. श्रावणी भडके यांचे अभंगवाणी, सकाळी १० ते ५ श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन गुरुकुंज वारी याचे उद्घाटन संजय महाराज पाचपोर यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून उल्हास महाराज सूर्यवंशी, प्रा. निलेश पर्बत हे उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी लक्ष्मणदास काळे महाराज राहणार आहे. सायंकाळी ६ ते ७ सामुदायिक प्रार्थना व चिंतन प्रा. सुभाष लोहे, रात्री ७ ते ८ श्रीकांत काठोळे यांची अभंगवाणी, रात्री ८ ते १० श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन. शनिवार दि.१९ ला सकाळी सामुदायिक ध्यान व चिंतन प्रशांत ठाकरे, ८ ते ९ नलिनीताई वेरूळकर यांचे ग्रामगीता प्रवचन, सकाळी १० ते ५ श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन, सायंकाळी ६ ते ७ सामुदायिक प्रार्थना व चिंतन अरविंद देशमुख रात्री ७ ते ८ नागपूर येथील श्रीगुरुदेव भजन मंडळ यांचे खंजिरी भजन, रात्री ८ ते १०.३० श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन होणार आहे. रविवार, दि. २० ला सकाळी सामुदायिक ध्यान चिंतन कैलास महाराज चव्हाण, सकाळी ८ ते ९ ग्रामगीता प्रवचन निलेश गावंडे, सकाळी ९ ते १२ श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलनाचा समारोह व बक्षिस वितरणाच्या अध्यक्षस्थानी संचालक मंडळाचे सदस्य सुरेंद्र भूवार राहणार असून ह.भ.प. चंदेलेनाना, पुरुषोत्तम महाराज मोरे, इंजि. रमेश ढवळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारी १२ ते ५ ग्रामगीताचार्य पदवीदान समारंभाच्या अध्यक्षस्थानी संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई बोंडे राहतील तर प्रमुख अतिथी म्हणून विजयादेवी राहणार असून उद्घाटन सर्वाधिकारी लक्ष्मणराव गमे करणार आहे. सायंकाळी सामुदायिक प्रार्थना व चिंतन सुश्री रामप्रियाजी, रात्री ७ ते ८ मी होणार सुपरस्टार छोटे उस्ताद विजेते संकल्प काळे यांची भजन संध्या, रात्री ८ ते १० विशाल महाराज खोले यांचे कीर्तन व रात्री १० ते १९ शुकदास महाराज गाडेकर यांचे कीर्तन होईल. सोमवार दि. २१ ला सकाळी सामुदायिक ध्यान व चिंतन पद्मभूषण डॉ. कमलेश पटेल, सकाळी ८ ते ९ ग्रामगीता प्रवचन हरिभाऊ वेरूळकर, सकाळी ९ ते १२ अ.भा. श्रीगुरुदेव सेवामंडळ कार्यकर्ता संमेलन सत्कार व पुरस्कार वितरण या संमेलनाचे अध्यक्ष संचालक मडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई बोंडे राहतील प्रमुख मार्गदर्शक संचालक मंडळाचे उपाध्यक्ष ना. सुधीर मुनगंटीवार, सुरेंद्रजी भुयार, बंटीभाऊ भांगडीया हे मार्गदर्शन करतील. दुपारी २.३० ते ३.०० समर्थ आडकोजी महाराज संस्थान बरखेड, जन्मभूमि यावली, तपोभूमी गोंदोडा येथील पालख्यांचे स्वागत व पूजन, दुपारी ३.३० ते ६.०० मौन श्रद्धांजली सर्व संत स्मृति मानवता दिन सर्वधर्मीय प्रार्थना व सामुदायिक प्रार्थना, रात्री ६ ते ६.४५ विश्वशांतीका महामंत्र सामुदायिक प्रार्थना, रात्री ६.४५ ते ७.१५ सेवामंडळाचा उद्देश ॲड. दिलीप कोहळे, रात्री ७.१५ ते ८ स्वरगुरुकुंजाचे यांचा खंजिरी भजनाचा कार्यक्रम, रात्री ८ ते १०.३० प्रसिद्ध गायक उस्ताद उस्मान मिर (राजकोट) हे भजन संध्या सादर करतील. रात्री १०.३० ते ११.३० लक्ष्मणदास काळे महाराज यांचे कीर्तन होईल. मंगळवार, दि.२२ ला सकाळी सामुदायिक ध्यानावर प्रकाश वाघ यांचे चिंतन, सकाळी ६.४० ते १० दींडी व पालखी प्रदक्षिणा, सकाळी १० ते १२ गोपाल काला व त्यावरील सचिन पवार यांचे कीर्तन होईल. दुपारी ३ ते ५.३० व्यायाम संमेलन व व्यायाम प्रात्यक्षिक हनुमान प्रसारक मंडळ अमरावती संयोजक रायजीप्रभू शेलोटकर, सायंकाळी सामुदायिक प्रार्थना व प्रार्थनेवर दामोदर पाटील यांचे चिंतन. रात्री ७.३० ते १०.३० खंजिरी भजन संध्याने या महोत्सवाचा समारोप होणार आहे.या सर्व कार्यक्रमाचा तमाम गुरुदेव भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे

साखळी उपोषणाची संदीप शेळके यांच्या हस्ते सांगता आदिवासी पुनर्वसित गावांच्या समस्या लागणार मार्गी

बुलढाणा दि १४ : आंबाबारवा, रोहिणीखिडकी, चुनखेडी, शेंबा येथील ग्रामस्थांनी विविध मागण्यांसाठी गत पाच दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरु केलेल्या बेमुदत साखळी उपोषणाची शिवसेना (उबाठा) जिल्हा समन्वयक संदीप शेळके यांच्या हस्ते १४ ऑक्टोबर रोजी सांगता झाली.

पुनर्वसनाच्या मोबदल्याचे मूल्यांकन अद्याप २००८ प्रमाणे असून, २०१६ मध्ये पुनर्मूल्यांकन केले आणि १० लाख रुपये मोबदला व्याजासह द्यावा, २००८ ते २०१६ दरम्यान विवाह केलेल्या मुलींना मोबदला दिला जावा, अंबाबारवा गावातील नागरिकांचे सर्वेक्षण करून मोबदला दिला जावा, २०१८ च्या शासन निर्णयानुसार पुनर्वसित कुटुंबांना १ एकर जमीन वाटप करण्यात यावी, वाहन खरेदीसाठी सबसिडी सर्व पुनर्वसित नागरिकांना लागू करावी, बेरोजगार तरुणांना शासकीय सेवेत संधी द्यावी, घरकुल योजनेंतर्गत लाभार्थींना प्राधान्य दिले जावे, वसाडीमध्ये घरकुलासाठी जागा आणि घरकुल मंजूर करावे, अंबबारवा गावातील बंद रस्ता उघडण्यात यावा ज्यामुळे धार्मिक ठिकाणी जाणे शक्य होईल, विजपुरवठा मिळवण्यासाठी महावितरण मार्फत कार्यवाही करावी, अपात्र ठरवलेल्या नागरिकांची फेरतपासणी करून पात्र घोषित करावे, पुनर्वसनामुळे फसवणूक झालेल्या लोकांच्या प्रकरणांची चौकशी सीबीआयमार्फत करून कारवाई करावी, २००८ आणि २०१२ च्या शासन निर्णयांची प्रत पुनर्वसित लोकांना उपलब्ध करून द्यावी आदी मागण्यासाठी आंबाबारवा, रोहिणीखिडकी, चुनखेडी, शेंबा येथील ग्रामस्थांनी १० ऑक्टोबरपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू केले होते. दरम्यान लेखी आश्वासन मिळाल्याने आज उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी अकोटचे सहा. वनसंरक्षक गणेश टेकाळे, महसूल अधिकारी प्रमोद करे , नायब तहसीलदार विजय हिवाळे, यांच्यासह उपोषकर्ते राजेश मोरे, मदन मूलदार बारक्या मोरे, वयर सिंग जमाददार, चंदन मोरे, सचिन मुरादम, नंदू मोरे, कमलेश चंगळ आदी उपस्थित होते,अशी माहिती शेळके यांच्याकडून देण्यात आली आहे.

अंजनगांव सुर्जी येथे रावन दहन करुन विजयादशमी पर्वाची उत्साहात सांगता

अनेक वर्षांची परंपरा आजही कायम; चाळीस फूट रावण प्रतीकृतीचे होते आकर्षण

अंजनगाव सुर्जी दि. १४ : सत्याचा असत्यावर,दुर्जनशक्तीवर सज्जनशक्तीच्या विजयाचे पर्व म्हणजे विजयादशमीचा सोहळा काठीपूरा येथे पारंपारिक रीतिरिवाजा प्रमाणे उत्साहात साजरा केल्या गेला.पारंपरिक अनेक वर्षाच्या परंपरेला अनुसरून दसरा महोत्सव समिती व बलराम व्यायाम शाळेच्या माध्यमातून याही वर्षी रावणदहन आणि शस्त्र पूजनाच्या कार्यक्रमाला माजी आमदार रमेश बुंदीले,माजी नगराध्यक्ष अड.कमलकांत लाडोळे,ठाणेदार प्रकाष अहीर,देविदास पा. वाळके,रामभाऊ टेकाम सर,अशोक बर्हांनपुरे,प्रसाद संगई,विवेक संगई,सचीन गावंडे ,सचीन जायदे,ज्ञानेश्वर नायडकर, ममता जैस्वाल,प्रीयंका मालठाणे, यांची प्रमुख उपस्थिती लाभली.यावेळी चित्तथरारक प्रात्यक्षिकासह लहान मुलामुलींनी दखणी लेझीम चे सादरीकरन करीत उपस्थितांची मने जिंकली.त्यानंतर स्थानीक लोकपरंपरे नुसार अंजनगांव सुर्जी येथील नागारीक रावणास व सिध्देश्वर महादेवास सोने अर्पण करुण राम,लक्ष्मन,सिता या पात्रांचे हस्ते रावनाचे प्रतीकृतीचे दहण झाल्यावर गावगाड्यात सोने वाहण्याची सुरवात केल्या गेली.याही वर्षी नगरातील नागरिकांनी रावण दहण कार्यक्रम करीता आपली परंपरा जोपासना करत कार्यक्रम स्थळी प्रचंड संख्येने ऊपस्थीती दीली. कार्यक्रमाचे आकर्षन तब्बल चाळीस फूटाची रावणाची प्रतीकृती होती.नागरिकांचे, आबालवृद्धांचे सहभागातुन दसरा महोत्सव कसल्याही प्रकारे गालबोट न लागता शांततेत आनंदाने पार पडला.रावण दहन तथा वीजयादशमी मोहत्सव समीतीने दरवर्षी प्रमाणे नागरीकांनी जो प्रतीसाद दीला त्या नीमीत्य रावन दहन समितिचे मा.नगरसेवक सचीन जायदे ,अमोल पटेल,अवि ढेंगे,अनील जवंजाळ ,संतोष ठणगण,गजानन बारड,आर्यन जायदे,श्री शेवाने व वीजयादशमी मोहत्सव समीतीचे शंकर मालठाने,भुपेंद्र भेलांडेसर,सुनिल चोपडेसर ,ऋतीक बुदीले,शंभु मालठाने,प्रविन फाटे,विशाल भेलांडे, रफीक शहा,कार्तीक चंदनपत्री या सर्व पदाधीकार्यांनी सोहळ्या नीमीत्य पोलीस स्टेशण,नगरपालीका ,रावणाची प्रतीकृती नीर्माता निखील स.चव्हाण,विषेश सहकार्या बद्दल पवन हंतोडकर व नगरातील नागरींकाचे कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता आभार व्यक्त केले.

प्रा.अजय देशपांडे यांची मुख्याध्यापक तथा प्राचार्य पदी नियुक्ती

वाठोडा चांदस दि. १४ : वरुड तालुक्यातील वाठोडा चांदस येथील आर.जी. देशमुख कृषी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तथा एम.सी.व्ही.सी. च्या मुख्याध्यापक तथा प्राचार्य पदी प्रा. अजय देशपांडे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली.

श्रीराम लिटरली इंडस्ट्रियल अँड अग्रिकल्चर संस्था वाठोडाचे अध्यक्ष अनिल कुमार देशमुख यांनी प्रा.अजय देशपांडे यांना मुख्याध्यापक तथा प्राचार्य पदाच्या नियुक्तीचा आदेश दिला. याप्रसंगी संस्थेचे सचिव अश्विनदादा देशमुख, उपाध्यक्ष देवेंद्रभाऊ बोडखे, व पर्यवेक्षक एस. एन. राऊत उपस्थित होते. विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी प्राचार्य पदी विराजमान झाल्याबद्दल अजय देशपांडे यांना शुभेच्छा दिल्यात. प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रा. अजय देशपांडे यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विद्यालयामध्ये सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लायन्स क्लब इंटरनॅशनल ३२३४ क१ चे गव्हर्नर सन्माननीय डॉ रिपल राणे सर, सन्माननीय सौ. कालिंदी ताई राणे यांनी माजी झोन चेअरपर्सन लायन्स क्लब अमरावती ला. अँड प्रशांत देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांची सदिच्छा भेट घेतली या वेळी विविध विषयांवर चर्चा झाली. या प्रसंगी शाल व रोपटे देवून त्यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी सौ नयना प्रशांत देशमुख ह्या उपस्थित होत्या

ऑनलाइन विशेषांक ही अभिनव संकल्पना : श्रीपाल सबनीस

पुणे दि. १४ : ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा.श्रीपाल सबनीस यांच्या शुभ हस्ते पुणे येथील त्यांच्या निवासस्थानी अनौपचारिकपणे 'गझलकार' सीमोल्लंघन २०२४ ह्या ऑनलाइन अंकाचे प्रकाशन संपन्न झाले. त्यावेळी मा. श्रीपाल सबनीस बोलत होते. ते म्हणाले, केवळ मराठी गझलेला वाहिलेल्या ह्या ऑनलाइन अंकाची ही अभिनव संकल्पना मला आवडली. हा उपक्रम गेली सोळावर्षे चालविणाऱ्या संपादक, सहसंपादकांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

यावेळी अंकाचे सल्लागार संपादक शाहीर सुरेशकुमार वैराळकर आणि गझलकार कीर्ती वैराळकर - इंगोले उपस्थित होत्या. मराठी रसिकांना मराठी गझलने चांगलेच वेड लावले आहे. मराठी गझलच्या कला आणि कौशल्यासंबंधी सबकुछ देणाऱ्या, ख्यातनाम गझलकार श्रीकृष्ण राऊत यांच्या 'गझलकार' या मराठी गझलच्या ब्लॉगचा 'गझलकार' सीमोल्लंघन हा वार्षिकांक दरवर्षी दसऱ्याच्या निमित्ताने मागील सोळा वर्षांपासून ऑनलाईन प्रकाशित होत आहे. यंदा ह्या अंकात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील २०९ मराठी गझलकारांच्या ६०० हून अधिक गझला तसेच मराठी गझल संदर्भातील महत्त्वाचे लेख, गझलसंग्रहाची परीक्षणे समाविष्ट आहेत. ह्या अंकाचे सल्लागार संपादक शाहीर सुरेशकुमार वैराळकर असून ख्यातनाम ज्येष्ठ गझलकार श्रीकृष्ण राऊत यांनी हा अंक संपादित केला आहे. देश, विदेशात सुप्रसिद्ध असलेले अकोल्याचे नामवंत चित्रकार सतीश पिंपळे यांनी ह्या अंकाचे देखणे मुखपृष्ठ केले आहे. अंकाचे सहसंपादक युवा गझलकार अमोल शिरसाट,विनोद देवरकर आहेत. मुद्रित शोधनाची महत्त्वपूर्ण बाजू गझलकार बाळू घेवारे यांनी सांभाळली आहे. खाली दिलेल्या लिंकवर हा अंक वाचता येईल. https://gazalakar24.blogspot.com/?m=0

सेवन कॅन्डल्स् फाऊंडेशनची दांडिया स्पर्धा संपन्न

अमरावती दि. १४ : गगलानी नगर कॅम्प येथील सेवन कॅन्डल्स् फाउंडेशन ही महिलांकरिता स्थापन केलेल्या संस्थेने महिलांमधील सुप्त गुणांना वाव देण्याकरिता महिलांची खुली ग्रुप दांडिया स्पर्धा गुरुवारला दि. १०/१०/२४ रोजी योगभवन कॉग्रेस नगर रोड अमरावती येथे आयोजित केली होती. स्पर्धेला महिलांचा उत्फुर्त प्रतिसाद मिळाला.अनेक महिलांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन दांडिया नृत्याचा आनंद घेतला. या कार्यक्रमाला मा. लेडी गव्हर्नर कमलताई गवई,सौ अनुपमा राणा यांचे मोलाचे

मार्गदर्शन व सहकार्य केले.

दांडिया स्पर्धेत सहभागी ग्रुपपैकी प्रथम पारितोषिक हनी ग्रुप डान्स यांना द्वितीय पारितोषिक मॉम्स ग्रुप डान्स यांनी पटकावले. तर बेस्ट कॉस्टुम प्रियंका वारदानी इणि साक्षी रुपानी यांनी पटकावले. पारितोषिक वितरण लिना वासनिक यांनी केले. स्पर्धेचे परिक्षक म्हणुन लिना वासनिक,विद्या पवार,डॉ.सुविधा गवई यांनी काम पाहिले. सेवन कॅन्डल्स् फाउंडेशनच्या पदधिकारी संगीता जामनिक,सविता इंगळे,रेखा भारशंकर,सुनंदा गायकवाड,प्रतिभा गायगोले,प्रा.बबिता थोरात यांनी विशेष परिश्रम घेतले.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्यजीव सप्ताहाचा समारोप

अमरावती, दि. १४ : मेळघाट व्याघ्र प्रकल्प आणि विविध संस्थांतर्फे १ ते ७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आयोजित स्पर्धांचा बक्षिस वितरण कार्यक्रम वनसंरक्षक तथा मेळघाट व्याघ प्रकल्पाचे क्षेत्र संचालक एम. आदर्श रेड्डी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मानद वन्यजीव रक्षक जयंत वडतकर, निशिकांत काळे, अनिल आसोले, प्रा. गजानन वाघ, सर्वेश मराठे आदी उपस्थित होते.

वन्यजीव सप्ताहात वने व वन्यजीव यावर आधारीत चित्रकला, निबंध, वक्तृत्व, परिसंवाद, छायाचित्र, फेस पेंटिंग, घोषवाक्य, निसर्ग प्रश्न मंजुषा स्पर्धा पार पडल्या. यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, विनायका गुरुकुल, होलीक्रॉस इंग्लिश हायस्कूल, कस्तुरबा इंग्लिश हायस्कूल, अमरावती, श्रीराम विद्यालय, शिवाजी बहुउद्देशीय शाळा, जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा, ज्ञानमाता इंग्लिश हायस्कूल, मनीबाई गुजराथी हायस्कूल, नारायणा हायस्कूल, शारदा विद्यालय, तखतमल इंग्लिश स्कूल, अभ्यासा हायस्कूल, प्रेमकिशोर सिकची हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्राविण्य प्राप्त विध्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प आणि स्टँडिंग फॉर टायगर संस्था, परतवाडा, ऑर्गनायझेशन फॉर कुला, मेळघाट, युथ फॉर नेचर कंझर्वेशन, अमरावती, निसर्ग संरक्षण संस्था, निसर्ग कट्टा संस्था, अकोला, अरण्यंम संरक्षण संस्था, प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, परतवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेत्रीय स्तरावर शालेय विद्यार्थ्यांसाठी ट्रेकिंग, वन्यजीव आधारीत माहितीपट व सादरीकरण, जंगल भ्रमंती, निसर्ग शिबीर, वन्यजीव जनजागृती दिंडी, ओळख करू फुलपाखरांची, पत्रकारिकेतून वनसंवर्धन यावर आधारित व्याख्यानमला, स्वच्छता अभियान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यातून शालेय विद्यार्थ्यांना वने व वन्यजीव संवर्धनाबाबत जागृती करण्यात आली. उपजीविका तत्ज्ञ ज्ञानदीप तराळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी वन्यजीव व संशोधन मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे विभागीय वन अधिकारी एम. एन. खैरनार, वनपाल प्रदीप भड, वनरक्षक संदीप खंडारे, रेखा कोकरे, रेशमा वानखडे, दीपा बेलाह, पर्यटन व्यवस्थापक स्वप्नील बांगडे, सामाजिक समन्वयक अतुल तिखे, ग्राफीक डिझायनर आनंद विपट, रोशन गोयटे यांनी पुढाकार घेतला.

श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात शेअर मार्केट वर कार्यक्रम संपन्न

अमरावती दि. १४ : स्थानिक श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात सोमवार १४ तारखेला वाणिज्य विभागातर्फे प्राचार्य डॉ. राजेश चांडक, शरदचंद्र महिला महाविद्यालय, साकोली, जिल्हा गोंदिया (महाराष्ट्र) यांचे शेअरिंग द सीक्रेट्स ऑफ शेअर मार्केट या विषयावर मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी मंचावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया, प्रमुख अतिथी डॉ. राजेश चांडक, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. अरुणजी हरणे, नॅक समन्वयक डॉ. कांतेश्वर ढोबळे, रिसर्च सेंटरच्या समन्वयक डॉ. सोनल चांडक, डॉ. जयंतकुमार गुप्ता मंचावर उपस्थित होते. पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे

प्रास्ताविक डॉ.अरुण हरणे यांनी केले. प्रमुख अतिथी डॉ. राजेश चांडक म्हणाले की,शेअर मार्केट ही एक डायनॅमिक इकोसिस्टम आहे जी व्यक्तींना कंपन्यांच्या वाढीच्या कथेचा भाग बनण्याची आणि संभाव्य आर्थिक नफा मिळविण्याची संधी देते. त्याच्या प्राथमिक आणि दुय्यम बाजार विभागापासून ते लाभांश आणि बाजार भांडवलीकरणाच्या संकल्पनांपर्यंत, शेअर बाजार अशा अटींनी भरलेला आहे जो सुरुवातीला जटिल वाटू शकतो परंतु गुंतवणूकदारांसाठी प्रचंड क्षमता आहे.

गुंतवणुकीच्या जगात प्रवेश करण्यास इच्छुक असलेल्यांना, शेअर बाजार जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढ आणि समृद्धीमध्ये सहभागी होण्याची संधी देते. तुम्ही दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचे, विविधीकरणाचे किंवा आर्थिक लँडस्केपचे सखोल आकलन करण्याचे उद्दिष्ट ठेवत असलात तरी, शेअर मार्केट हे निःसंशयपणे एक प्रवेशद्वार आहे जे शक्यतांच्या जगासाठी दरवाजे उघडते. तुम्ही या क्षेत्रात नेव्हिगेट करत असताना, मूलभूत गोष्टी समजून घेणे आणि माहिती ठेवणे हे यशस्वी गुंतवणुकीच्या मार्गावर तुमचे सर्वोत्तम सहकारी असतील. तसेच

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी, एखाद्याला डीमॅट आणि ट्रेडिंग खाते आवश्यक आहे, जे शेअर्स धारण करणे आणि व्यवहार करणे सुलभ करते. आजच डीमॅट आणि ट्रेडिंग खाते उघडा आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या विशाल जगाकडे आपले पहिले पाऊल टाका असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मा. श्री वसंतकुमारजी मालपाणी आणि सचिव डॉ. गोविंदजी लाहोटी यांनी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया यांनी महाविद्यालयाबाबत माहिती सांगितली. या कार्यक्रमाला डॉ. अरुण हरणे, डॉ. सोनल चांडक , डॉ.जे.डी. गुप्ता, डॉ. कान्तेश्वर ढोबळे, डॉ. जया सवाईथुल, डॉ. गायत्री तिवारी, डॉ. आशिष मोहता, डॉ. रचना राठी, डॉ. अर्पिता लड्ढा उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित जोशी तर आभार कु. करिश्मा इंगोले या विद्यार्थ्यांनी केले.